# मराठी भाषा साहित्यामध्ये पडलेले गांधी विचारांचे प्रतिबिंब

**प्रा. पुजा बाजीराव पाटील,** स. ब. खाडे महाविद्यालय कोपार्डे, ता. करवीर, जि. कोल्हापूर

---

**प्रस्तावना :-**

राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हटले की, भारताचा स्वातंत्र्य लढा आणि त्या स्वातंत्र्य संग्रामाची धूरा खंबीरपणे आपल्या खांद्यावर घेऊन यशापर्यंत पोहचणारे व्यक्तीमत्व डो्ळयासमोर उभे राहते. ब्रिटीश राजवटीपासून भारताच्या यशस्वी मोहिमेचे नेतृत्व करताना कोणतेही शस्त्र न उचलता अहिंसेचा मार्ग चालत व संपूर्ण भारताला त्या मार्गावर चालण्यासाठी प्रेरित करणारे असे होत. अहिंसेच्या मार्गाचे महत्त्व केवळ भारतापुर्तेच न ठेवता जगभरात त्याचा प्रसार करणारे म्हणून गांधींकडे गेली कित्येक दशके पाहिले जाते. याचे प्रतिक म्हणूनच की काय ? जगभरातील शंभरहून अधिक देशात गांधींची स्मारके आहेत. त्यांच्या नावाचे रस्ते, पुतळा, पोस्टाची तिकीटे कोणत्या ना कोणत्या स्वरुपात आजही गांधीजींच्या स्मृती हे देश जपताना पहायला मिळतात. गांधींच्या विचारांचा पगडा स्वातंत्र्यकाळात एवढा प्रखरपणे जगावर भारतीय लोकांवर पडला तो आजतागायत चिरंतर आहे. आजही बहुतांशी भारत हा गांधीविचारास प्राधान्य देणारा असल्याचे पाहायला मिळते. असहकार आणि अहिंसेच्या तत्वावर आधारित सत्याग्रहाचा वापर हे गांधी सूत्र वापरत आज बहुतांशी राजकीय सामाजिक लढाया लढल्या जातात. म्हणूनच गांधी विचार हे कालबाह्य ठरत आहेत. असे म्हणणे योग्य ठरणार नाही.

गांधींच्या या विचारांना जिवंत ठेवण्याचे कार्य साहित्य क्षेत्राने केले आहे, असे म्हणावे लागेल. खर तर, साहित्य क्षेत्रात गांधीजी आणि त्यांच्या विचारांनी आपले एक स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. आजच्या युगात गांधीजींच्या कार्यावर विविध स्तरावर चर्चा होतात. या चर्चामध्ये राजकीय हेतू साध्य करण्यासाठी बहुतेक वेळा गांधींवर टिका टिप्पण्या केल्या जातात ; त्याचे विचार किती मागास, बुरसटले गेले आहेत, यावर भर दिला जातो. यामध्ये तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात गांधींपासून दुरावलेला जाणवतो. असे असले तरी सोशल मिडिया वरून गांधी विचार आत्मसात करण्यापेक्षा साहित्यकृतींचा अभ्यास करुन गांधी व गांधीविचार जाणून घेणे अचूकतेचे लक्षण ठरेल.

देशासाठी आयुष्य वाहिलेल्या दूरदृष्टी राष्ट्रपुरुषाचे विचार अनेक साहित्यिकांनी अभ्यासपूर्ण रित्या मांडले आहेत. त्याच्याधारे गांधीविचार मानवतावादी आहेत की नाही हे ठरविणे वाचकास सुलभ जाईल.

**अभ्यास विषय निवडीमागील उद्देश :-**

१) गांधीविचाराचा साहित्यावर पडलेला प्रभाव तपासणे.

२) साहित्यिकांचा गांधीवादी विचाराच्या दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.

३) गांधीवादी विचाराचा साहित्यातून समाजावर पडलेला प्रभाव पडताळणे.

४) वाङ्मयीण साहित्याच्या आधारे स्वातंत्र्य कालखंडातील राजकीय उलाढालीचे पैलू अभ्यासणे.

मराठी साहित्यांमध्ये प्रचंड प्रमाणात गांधीजीवर लेखन केले गेलेले आढळते. गांधींचे विविध पैलू आपल्या लेखन क्षमतेतून जगाच्या अभ्यासास वाचकापर्यंत पोहचविण्याचे कार्ये मराठी साहित्याच्या साहित्यप्रकारांनी केल्याचे पहायला मिळते त्याचा आढावा पुढील प्रकारे घेता येईल.

**मराठी कादंबरी आणि गांधी :-**

वास्तव कल्पना, चिंतन या प्रतिमा शक्तीवर आधारलेला वाडमय प्रकार म्हणजे कादंबरी होय. इतर वाङ्मय प्रकारापेक्षा कादंबरीची छाप वाचकावर अधिक प्रभावीपणे पडते. कादंबरीचा नायक चिरंतरकाळ वाचकाच्या मनावर रेंगाळत राहतो. म्हणूनच स्वातंत्र्य लढ्याच्या काळातील मराठी कादंबरीचा नायक उभेउभ गांधींसारखा भासतो. हा काळ आधुनिक मराठी कादंबरीच्या उदय आणि प्रारंभिक विकासाचा टप्पा असल्याने बहुतांशी मराठी साहित्यिकांनी या काळात गांधीजींनी समाज जीवनात घडवून आणलेल्या क्रांतीचा आधार आपल्या साहित्यकृतीस दिला. फडके, पु. ल. देशपांडे, वा.म. जोशी, खांडेकर, मांडगोलकर इ. प्रतिभावंताचा हा कालखंड असल्याने अभ्यासपूर्ण व प्रगल्भ असे साहित्य गांधींवर तयार होण्यास दिशा मिळाली गो.म. कुलकर्णी यांनी त्यांच्या 'गांधीवाद आणि आधुनिक मराठी' साहित्य या लेखात गांधी कालखंडातील लिखाणाच्या गांधीविषयक दृष्टिकोनाचे विश्लेषण केले आहे. मांडखोलकरांच्या ' आरुंधती ' कादंबदीतील रमणभाई हे गांधीवादी नेते असल्याचे पहायला मिळते. 'मुखवटे' कादंबरीत तर गांधी एक खलनायक अशी भूमिका मांडखोलकर मांडतात. गांधींचे सत्य आणि अहिंसा हे केवळ मुखवटे आहेत; गांधी स्वयंकेंद्रित, लहरी व अहंनिष्ठ असे वर्णिलेले आढळतात. 'कांता' या बाबासाहेब खापर्ड्यांच्या कादंबरीत गांधींमुळे कुटुंबात कसा कलह माजला याचे वर्णन येते. सर साहेबांचा मुलगा प्रियदर्शन गांधीविचाराने प्रभावीत तर बाप गांधींना विरोध करणारा यामुळे बापलेकात वैरस्व भावना निर्माण

होते त्यास कारण गांधी असे चित्र रंगवलेले पहावयास मिळते. निफाडकरांची 'महात्मा गांधी – सैतान की साधू ?' ही कादंबरी टिळक – गांधी यांच्यातील मतमतांतरांची व्याप्ती सुचित करते. केतकरांची 'आशावादी' कादंबरी गांधी चळवळीस विरोध करणाऱ्या नागपूरी संघर्षाचे प्रतिक आहे. केतकरांच्या 'गोंडवनातील प्रियंवदा' या कादंबरीतही गांधीवाद आढळतो. केतकरांची शेवटची अपूर्ण कादंबरी ' भटक्या ' ही कॉंग्रेसमध्ये प्रत्येकाचे पद अस्थिर आहे; स्थिर असेल तर ते फक्त गांधी !अशी राजकीय टिका करते, तर पु.य. देशपांडे ' भेरीघोष की धर्मघोष ' या कादंबरीतून गांधीवादाकडे वळतात.

थोडक्यात वरील काही संदर्भातून हे लक्षात येते की, गांधींच्या विचारांचा, वर्तनाचा, चळवळींचा मोठा परिणाम मराठी कादंबरी निर्मितीवर झाला. प्रसिद्ध समिक्षक डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी समकालीन कादंबऱ्यांचा विचार करून असे मत व्यक्त केले आहे. की, " तत्कालीन रंगभूमी ही मुख्यत्वे गांधींच्याच राजकारणाने भरली गेलेली असल्याने तत्कालीन लेखकांनी कादंबरीचा हत्यारासारखा उपयोग केला."

**मराठी कविता आणि गांधी :-**

वाङमय प्रकारात सर्वात उत्स्फुर्त आणि उत्कट प्रकार म्हणजे कविता होय. कमी शब्दांत अधिकाधिक भावना, अर्थ, माहिती देणारे साधन म्हणून कवितेकडे पाहिले जाते. स्वातंत्र्यपूर्व काळात संपूर्ण देश गांधींच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झाल्याने त्यांनी सुरू केलेल्या चळवळींवर असंख्य कविता लिहल्या गेल्या. मराठी कवी त्यास अपवाद नाहीत. भा.रा.तांबे, माधव ज्युलियन, यशवंत विठ्ठलराव घाटे ते मर्ढेकर, पु.शि.रेगे त्यानंतर कुसुमाग्रज, करंदीकर, पाडगावकर, बापट इ. महान कवींनी विविध पिढ्यांमधील, विविध प्रवृत्तीच्या, गांधींवर आधारित कविता लिहल्या आहेत.

बाबा आमटे यांची ' गांधी एक हिमनग ' ही कविता म. गांधींचे महात्म्य वर्णन करते तर राम शाहिर -

टिळक भक्त ही गांधीभक्त् ही एकच मागणं दोघांना

एकच आहे ध्येय आपुल मुठमाती द्या वादांना

असे आपल्या काव्यातून आव्हान करताना दिसतात. विंदा करंदीकरांनी गांधी हत्येनंतर निर्माण झालेली अस्वस्थता आपल्या काव्यातून मांडली आहे. तुकडोजी महाराज आपल्या ' ग्रामगीता ' कवितेतून गांधींचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहचवितात. वसंत गुर्जर यांची वादाच्या भोव-यात सापडलेली ' मला गांधी भेटला ' ही कविता गांधी जीवन कार्याचा आढावा घेणारी पण गांधींच्या पश्चात माजलेल्या अराजकतेचे वर्णन करते. अलीकडच्या काळात रा.ग. जाधव यांनी लिहलेली बापू एक भाषित चिंतनकाव्य ही सुद्धा गांधी आणि मराठी काव्य यांच नात निदर्शित करते. असे असले तरी आजच्या मराठी कवींच्या मन:पटावरुन गांधींची प्रतिमा पुसट होताना दिसते आहे हे वास्तव आहे.

**मराठी नाटक आणि गांधी :-**

नाटक ही वाङमय प्रकारातील प्रेक्षकांपर्यंत थेट पोहचणारी ललित कला आहे. स्वातंत्र काळात प्रबोधनासाठी नाटकांचा खूप मोठ्या प्रमाणात वापर केला गेला. स्वातंत्र्य संग्रामांचे प्रतिबिंब लेखनीच्या माध्यमातून नाटकांमध्ये उमटू लागले. डॉ. रा. श. वाळिंबे यांच्या मतानुसार नाटकास लोकाश्रय लागतो, आणि लोक गांधीच्या मागे असल्याने या काळात बहुतांशी नाटके गांधींची पाठराखण करणारी निर्माण झाली. यांची उदाहरणे पाहताना रसिकांच्या पसंतीस उतरलेलं मामा वरेरकर यांचे ' सत्तेचे गुलाम ' हे लक्षात घेता येईल. त्याचबरोबर गांधी – आंबेडकर पुर्ण करारा वर आधारित गांधींची अस्पृश्यता निवारणाची आग्रहाची भूमिका वर्णन करणारे ' तुरुंगांच्या दारात ' हे नाटक लिहून वरेकरांनी गांधीवादी मराठी नाटकांमध्ये भर घातली. यासोबत काकासाहेब खाडिलकर यांनी ' द्रौपदी ' या नाटकातून टिळक – गांधी यांच्या राजकारणातील सांधेबद्दल उलघडला आहे. तर 'संगीत मेनका' या नाटकातून ते कौन्सिल प्रवेश विरुद्ध कौन्सिल बहिष्कार या राजकीय वादाचा पडताळा जनसामान्यापर्यंत पोहचवितात. ' उग्रमंग ' या नाटकाच्या माध्यमातून वासूदेव खरे टिळक – गांधी समन्वय मांडतात. तर ' रणदुंदुभी ' च्या माध्यमातून वामनराव जोशी अहिंसेच्या सुताला लोकमान्यांच्या तत्वज्ञानाचा पीळ जोडताना पहायला मिळतात. माया चिटणीस यांचे ' नवा पाईक ' हे नाटक सुद्धा गांधी वादाचे समर्थन करणारे नाटक होय. गांधींच्या वाढत्या प्रसिद्धी, लोकप्रेमामुळे मराठी नाटककार बहुतांशी गांधीवादास समर्थन करताना दिसतात. पण सावरकरांच्या ' सन्यस्त खड्ग ' नाटकांसारखी त्यांची अन्य नाटके गांधींच्या विरोधात तिसऱ्या शतकाच्या अखेर लिहलेली पहायला मिळतात. एकूण नाटकाचे मराठी वाङमय हे ९५% गांधी समर्थनाने भरलेले पहायला मिळते.

**गांधी विचार आणि वैचारिक साहित्य :-**

महान व्यक्तीचे विचार ज्ञान अनुभव समाज हिताचे मुल्य यांचा प्रकाश समाजातील तळागाळाच्या स्तरापर्यंत पोहचवण्याचे काम वैचारिक साहित्य करते. गांधी युगाच्या पहिल्या कालखंडात मराठीत अतिशय उच्च दर्जाचे वैचारिक साहित्य निर्माण झाले; कारण या पिढीतील लेखक सुरूवातीला गांधी विचाराने प्रभावित होते, स्वातंत्र्य लढ्यांच्या उभारणीत स्वत: सहभागी

होते, यामुळे गांधींबद्दल प्रभावी लेखन झाले. प्रारंभीच्या काळात ' पु.ल. देशपांडे ' आणि ' अवंतिकाबाई गोखले ' यांनी गांधींचे चरित्र लिहले. साने गुरूजींच्या लिखित ' बापूजींच्या गोड गोष्टी ', ' महात्मा गांधीचे दर्शन ' ही चरित्रे यांचा समावेश होतो. यांच्या सोबत विनोबा आचार्य, काका कालिलकर, दादा धर्माधिकारी, आचार्य जावडेकर, भागवत इ. वैचारिकांना गांधींवर प्रभावी वैचारिक लेखन केले या लेखकांच्या नंतरच्या काळात मात्र गांधींवरील लेखन समिक्षात्मक रूपात होऊ लागले. नलिनी पंडीत, चंद्रशेखर धर्माधिकारी, द.न. गोखले यांसारख्या निवडक लेखकांनी गांधींवरील वैचारिक लेखनाचा वारसा पुढे चालू ठेवला, पण त्या लेखनामध्ये बदलत्या काळानुसार गांधी – विचार नव्याने परिभाषित होताना दिसू लागते. पुढे ऐंशीच्या दशकात लेखन करणारी गांधी लेखनाची तिसरी पिढी म्हणावे लागेल या पिढीमध्ये प्रामुख्याने य.दि. फडके, भा.ल. भोळे, फक्रुदीन बेन्नुर, रामदास भटकळ, यशवंत सुमंत ही नावे महत्त्वपूर्ण आहेत. सध्याच्या काळातील गांधी लेखनाचा विचार करता विश्वास पाटील, अभय बंग, मिलिंद बाकील, चित्रा रेडेकर, चंद्रकांत वानखेडे यांनी गांधी विचारांवर वैचारिक लेखनाचे काम सुरू ठेवले आहे. असे असले तरी वैचारिक मराठीसाहित्य लेखनामध्ये गांधींवरील प्रभावी वैचारिक लेखनास उतरती कळा लागली आहे, हे तितकेच वास्तव आहे, हे लक्षात घ्यावे लागेल.

**समारोप :-**

१) इ.स. १९२० -१९५० हा कालखंड म्हणजे भारताच्या इतिहासातील गांधीयुग ह्या काळातील मराठी साहित्यिक आणि ग्राहक दोन्ही मध्यमवर्गीय होते. त्यामुळे सर्वसामान्य मराठी माणुस त्या काळात गांधींच्या कार्य व व्यक्तिमत्त्वाच्या छत्रछायेखाली असल्याने त्यास अनुसरून मराठी साहित्य निर्माण झाले; असे असले तरी काही प्रमाणात गांधी विचारांशी अलिप्त राहून गांधींवर उपरोधक साहित्य निर्मितीही या काळात झाल्याचे दिसते.

२) टिळक युगाच्या अस्तानंतर देशाची सुत्रे गांधींकडे गेल्यानंतर गांधी – विरोधक मोठा गट महाराष्ट्रात निर्माण झाला. यातून मराठी साहित्याचे माध्यम बनवून बहुतेक राजकीय हेतू साध्य केले गेले, याचाच परिणाम म्हणून गांधी – विचारांची कुचेष्ठा करणारे साहित्य मराठीत निर्माण झाले हे दिसते.

३) गांधींवर मराठी वाङ्मयात विपूल साहित्य निर्मित असले तरी आजचा लेखक गांधी – विचारांपासून खूप दुर गेला आहे. अलीकडच्या काळात गांधींवर लेखन करण्यात फारश्या लेखन्या उचलल्या गेल्या नाहीत. हे वास्तव आहे.

४) गांधीच्या विवेचनाती अन्य पैलूंच्या तुलनेत त्यांची विज्ञान - तंत्रज्ञानविषयक भूमिका, निसर्गोपचार इ. नाविन्य विषयांवर मराठी साहित्य निर्मित होऊ शकते; केवळ मराठी लेखकांनी याकडे दृष्टिक्षेप देणे अत्यंत गरजेचे आहे.

गांधीवाद नावाची संकल्पना व्यक्तिनिष्ठ नसून ती अथांग समुद्र आहे असे स्वत: गांधीजी म्हणतात. म्हणूनच गांधी विचारांना समजून त्यातील आजच्या पिढीला जे जे अनुकूल विचार ठरतील ते आपल्या कवेत घेत मराठी साहित्यिकांनी उद्याच्या गांधीवादी मराठी वाङ्मयास दिशा देण्याचे कार्य हाती घेतले पाहिजे.